# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.10.2025** **वार- मंगळवार**

---

**साखरकारखानेकारवाई**

राज्यातला अधिकृत उस गाळप हंगाम सुरू होण्यापुर्वी विनापरवान गाळप सुरू करणाऱ्या पाच साखर कारखान्यांवर साखर आयुक्तालयानं कारवाईची प्रक्रिया सुरू केली असून संबंधितांना सुनावणीसाठी बोलावण्यात आलं आहे. संबंधित कारखाने सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील आहेत.

**शिष्यवृत्ती**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीनं यंदा चौथी आणि सातवी वर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र संबंधित शाळांनी परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती भरण्यास सुरुवात करावी असं आवाहन परिषदेने केले आहे. या परीक्षेसंदर्भातील माहिती परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार असल्याचंही परिषदेनं जाहीर केलं आहे.

**वंदेभारतदौंड**

मुंबई सोलापूर दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसला दौंड इथं थाबा देण्यात आल्याचं रेल्वे विभागानं जाहीर केले आहे. कोविड संसर्गाच्या काळात दौंड, भिगवण, बोरीबेलसह काही स्थानकांवरील थांबे बंद

करण्यात आले होते. खासदार सुप्रिया सुळे दौंड थांब्यासाठी पाठपुरावा करत होत्या. अखेर चार वर्षांनी दौंडचा थांबा पुन्हा सुरू होणार आहे.

**पुणेमेट्रो**

महामेट्रोकडून मेट्रो मार्गिकेचा विस्तार केला जाणार असून, माण-हिंजवडी ते शिवाजीनगर तसंच शिवाजीनगर ते हडपसर या मार्गिकांचा विस्तार होणार असून राज्यसरकारने याविषयी आदेश दिले आहेत अशी माहिती पीएमआरडीएम महानगर आयुक्त डॉक्टर योगेश म्हसे यांनी दिली आहे.सध्या हिंजवडी ते शिवाजीनगर हा तिसरा मार्ग सार्वजनिक खासगी भागीदारीतून विकसित होत असलेला हा प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे.

**मकाहमी**

मका पिकासाठी शासनाच्या हमीभावापेक्षा कमी भावाने खरेदी केली जात असल्यानं जिल्ह्यात विविध ठिकाणी हमीभाव मका खरेदी केंद्रे सुरू करावीत अशी मागणी क्रांतीसिंह नाना पाटील ब्रिगेड महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शिवाजी नांदखिले यांनी केली आहे.

**हवाईदल**

पुणे हवाई दल स्थानकाकडून सेखो इंडियन भारतीय हवाई दल मॅराथॉनच्या पहिल्या आवृत्तीचं आयोजन येत्या २ नोव्हेंबरला होणार आहे. भारतीय हवाई दलाचे परमवीर चक्र विजेते फ्लाईंग ऑफिसर निर्मल जीत सिंह यांच्या साहस आणि सर्वोच्च बलिदानाला श्रद्धांजली अर्पित करण्याच्या हेतूने आयोजित केली जात असल्याचं संरक्षण दलाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलं आहे. यासाठी www.sekhoniafmarathon.in या अधिकृत संकेतस्थळावर सहभागींनी नोंदणी करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>सिंहगडकलाग्राम</u>**

सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे ओकोयामा उद्यानात पुणे पालिकेनं उभारलेल्या कलाग्राम या प्रकल्पाचे वार्षिक भाडेशुल्क ५१ कोटी रुपये ठेवल्याने त्याला प्रतिसाद मिळत नाही. हे भाडे अधिक असल्यानं यावर तोडगा काढण्यासाठी पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक आणि मालमत्ता व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्तांची संयुक्त समिती नेमली जाणार आहे. या समितीच्या अहवालानंतर कलाग्रामच्या भाडेशुल्काविषयी निर्णय घेण्यात येणार आहे.

**<u>पिंचि</u>**

पिंपरी चिंचवडमध्ये इंद्रायणी नदीकाठी छटपुजेचा उत्सव मोठ्या श्रद्धेने पार पडला. उत्तर भारतीय रहिवाशांनी पहाटेपासूनच नदीतीरी विधिवत पूजा केली. यावेळी आतषबाजीही करण्यात आली. भाविकांनी इंद्रायणीची आरती, पूजा आणि दीपप्रज्वलनही केले. महापालिकेच्या वतीनं काठांची स्वच्छता, तसंच निर्माल्य कुंडाची व्यवस्था करण्यात आली होती. तसंच अप्रिय घटना टाळण्यासाठी आपत्कालीन पथकंही तैनात करण्यात आली होती.

**<u>पिंचिकचरा</u>**

पिंपरी चिंचवड आरोग्य विभागाच्या वतीनं दिवाळीच्या काळात कचरा संकलनाची मोहीम राबवण्यात आली. या चार दिवसांत एकंदर 5६५८ टन कचरा सफाई कर्मचाऱ्यांनी संकलित केला. या काळात कचऱ्याचं प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन हे नियोजन करण्यात आलं होतं.

**<u>ग्रँडटूरसायकलिंगलोग</u>**

पुणे ग्रँड टूर सायकलिंग या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या बोधचिन्ह आणि जर्सीचं अनावरण उद्या सकाळी पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी स्पर्धेची अधिकृत घोषणाही करण्यात येणार आहे. . या

कार्यक्रमाला क्रीडा सचिवांसह भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा, तसेच सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे पदाधिकारी पंकज सिंग यांच्यासह इतर मान्यवरही उपस्थित राहाणार आहेत.

**<u>बालुफ</u>**

बालुफ ऑटोमेशन चषक ५४ व्या आंतरजिल्हा आणि ८७व्या राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा बालेवाडी इथं पार पडल्या. पुणे जिल्हा संघानं पंधरा वर्षीय मुलींच्या गटाच्या सांघिक विभागात अजिंक्यपद पटकावलं. मुलांच्या संघांमध्ये ठाणे संघ विजेता ठरला पुण्याला मात्र उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

**<u>पुणेहवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर आकाश ढगाळ राहिलं. कमाल तापमान 31 तर किमान २० अंश सेल्सिअस नोंदलं गेलं. शहर परिसरात उद्या तापमानात वाढीचा अंदाज असून, ढगाळ हवा आणि हलका ते मध्यम पावसाच्या सरी बरसण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**